**Gomantak, Wednesday 05 February 2020**

# डॉन बॉस्को महाविद्यालयात घडताहेत 'कृषी उद्योजक'

## विद्यार्थ्यांकडून दुग्ध प्रक्रिया, भेंडी लागवड, फलोत्पादनासह अळंबीचेही उत्पादन

गोमन्तक अँकर

उत्तम गावकर

**सासष्टी,** ता. ४ : विद्यार्थ्यांनी फक्त नोकरीच्या मागे न लागता, स्वंयरोजगाराच्या माध्यमातून इतरांनाही रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा. यासाठी डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या माध्यमाने उद्योजक बनण्याचे धडे देण्यात येत आहेत.

या महाविद्यालयातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना अखेरच्या सहा महिन्यासाठी दुग्ध प्रक्रिया, भेंडी लागवड, फलोत्पादन प्रक्रिया तसेच अळंबीची लागवड करून मिळालेल्या उत्पादनाची विक्री करण्याची मुभा देण्यात येत आहे.

सुलकर्णे येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाची स्थापना २०१५ साली करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग असलेला मॉड्युल शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे गेल्या वर्षापासून या अभ्यासक्रमास खरी सुरुवात झाली आहे. कृषी महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना हा मॉड्युल (अभ्यासक्रम) स्वंयरोजगार बनण्यास प्रोत्साहन देणारा असून फक्त नोकरीवर अवलंबू न राहता, महाविद्यालयात मिळालेल्या अनुभवाच्या बळावर स्वंयरोजगाराच्या माध्यमातून दुसऱ्यांनाही रोजगार प्राप्त करून देण्यास प्रभावी ठरणार आहे. दुग्ध प्रक्रिया, भेंडी लागवड, फलोत्पादन तसेच अळंबीची लागवड, असे चार मॉड्युल असून प्रत्येक मॉड्युलमध्ये शेवटच्या वर्षातील २० विद्यार्थी आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश कुंकळीकर यांनी दिली.

दुधावर प्रक्रिया करून लस्सी, दही, कुल्फी, गुलाब जामून व अन्य पदार्थ बनविण्यात येत आहेत. फलोत्पादनाद्वारे विविध प्रकारच लोणचे, फणसापासून तयार केलेले पदार्थ तसेच अन्य पदार्थ बनविण्यात येत आहेत. दुग्ध प्रक्रिया, भेंडी लागवड, फलोत्पादन तसेच अळंबीचेही उत्पादन करून मिळालेले उत्पन्न व तयार केलेल्या पदार्थांची विक्री करण्यात येत आहे. विक्रीसाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध नसल्यामुळे महाविद्यालयात ही विक्री करण्यात येत आहे. सुळकर्णे परिसरातील दुकानात या पदार्थांची विक्री करण्यात येत असून भाज्यांचे जास्त उत्पन्न मिळाल्यास नेत्रावळी फलोत्पादन विभागाला भाज्या पुरवण्यात येतात. मॉड्युल सुरू करण्यास महाविद्यालयाच्या निधीचा उपयोग करण्यात येत असल्याने मिळालेल्या नफ्यातून महाविद्यालयाने केलेला खर्च वजा करून राहिलेला नफा विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे, असे कुंकळीकर यांनी सांगितले. दुधावर प्रक्रिया करून पदार्थ बनविण्यासाठी महाविद्यालयात आधीच मशिनरी असल्यामुळे जास्त पदार्थ बनविण्यास जास्त खर्च येत नाही. तसेच, एका मॉड्युलद्वारे सहा महिन्याला अंदाजे ५० ते ६० हजाराच्या आसपास नफा मिळत आहे.

मॉड्युलद्वारे मिळालेल्या पैशातून विद्यार्थ्यांना आर्थिकमदत मिळत असून व्यवसाय करण्याचे ज्ञानही मिळत आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पदवी मिळण्याबरोबरच चांगले उद्योजकही बनवावे हा महाविद्यालयाचा मुख्य हेतू आहे. विद्यार्थ्यांना मॉड्युलद्वारे अभ्यास करताना मिळालेला आत्मविश्वास उद्योजक बनण्यास निश्चितच प्रोत्साहन देणार, असे कुंकळीकर यांनी सांगितले.


अनोखया उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पिकविलेली भेंडी.

### अनोखा उपक्रम

शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांकडून शेतीचे ज्ञान मिळविण्यासाठी महाविद्यालयाद्वारे विद्यार्थ्यांसाठी अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाला विद्यार्थ्यांच्या माध्यमाने शेतात पोचविण्यात येत आहे. हा उपक्रम नेत्रावळी, रिवण, मळकर्णे, पंचवाडी-सावर्डे, फातोर्डाबरोबरच उत्तर गोव्यातील नार्वे, डिचोली या भागातही राबविण्यात आलेला आहे, असे डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश कुंकळ्येकर यांनी सांगितले.


ऑईस्टर अळंबीची लागवड